जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर पोलीस
P.R.O. OFFICE, CRIME BRANCH, THANE CITY
Address- Office of Commissioner of Police, Thane City,
Near Kalawa Bridge, Thane West Maharashtra -400601
Email Id- cp.thane.tfzone125@mahapolice.gov.in
THANE POLICE COMMISSIONERATE

प्रेस नोट दिनांक :– ०९/०८/२०२४

## 'डोंबिवली परिसरात अंमली पदार्थाचे रॅकेट चालविणारा 'एम.डी.किंग' अटक, एकुण रू.२१,३०,०००/– किंमतीचा २१३ ग्रॅम एमडी अंमली पदार्थ जप्त'

डोंबिवली परिसरात तरूण वर्गात अंमली पदार्थ विक्री केला जात असल्याबाबत माहीती प्राप्त झाल्याने सदरबाबत कारवाई करण्याचे आदेश मा.पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे यांनी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांना दिले होते. त्या अनुषंगाने प्रविण अंकुश चव्हाण, वय ४२ वर्षे, रा.कुंभारखान पाडा, डोंबिवली यास दिनांक ०५/०३/२०२४ रोजी अटक करण्यात आली होती. त्यावेळी सदर आरोपीकडे एकुण रू. १४,३०,०००/– किंमतीचा १४३ ग्रॅम एमडी हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला होता. सदर अटक आरोपी विरूध्द विष्णुनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. २५६/२०२४ एनडीपीएस कायदा कलम ८(क), २२(क) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर अटक आरोपीस एमडी या अंमली पदार्थाचा पुरवठा कोणी केला होता याबाबत अधिक तांत्रिक तपास केला असता अशी माहीती निष्पण्ण झाली की, प्रविण विषंभर चौधरी उर्फ चुन्नी उर्फ एमडी किंग हा त्याचे साथीदारांचे मदतीने डोंबिवली परिसरात एमडी, गांजा हे अंमली पदार्थ विक्री करीत असतो. तसेच पोलीसांनी पकडू नये याकरीता तो त्याचे साथीदारांचे मदतीने रात्रीचे वेळी रिक्षामधुन अंमली पदार्थाची विक्री करीत असतो तसेच तो सदर रिक्षाचे ठिकाण दर अर्धा तासाने बदलत असतो. सदर बाबत अधिक तांत्रिक अभ्यास करून दिनांक २७/०७/२०२४ रोजी प्रविण विषंभर चौधरी, वय ५४ वर्षे, धंदा रिक्षाचालक, खालचा पाडा, डोंबिवली तसेच त्याचे साथीदार विनोद मनिराम पटवा, वय ३१ वर्षे, धंदा रिक्षाचालक, रा.सिध्दार्थ नगर, डोंबिवली व सशांक व्यंकटा नरसिम्हादेवरा उर्फ ॲप्पी, वय ३५ वर्षे, रा.कोपरगाव, डोंबिवली यांना अटक करण्यात आली आहे. प्रविण चौधरी उर्फ चुन्नी याचे ताब्यातुन एकुण रू.७,००,०००/– किंमतीचा ७० ग्रॅम वजनाचा एमडी हा अंमली पदार्थ तसेच सदर अंमली पदार्थ विक्री करीता वापरण्यात येणारी ऑटो रिक्षा जप्त करण्यात आली आहे. अटक आरोपी प्रविण चौधरी उर्फ चुन्नी हा स्वत:स डोंबिवलीचा एमडी किंग असे संबोधीत करीत असून तो यापुर्वी देखील चरस तस्करीच्या गुन्हयात अटक होता. कारागृहातून जामिनावर सुटून आलेनंतर त्याने पुन्हा डोंबिवली शहरात एमडी व गांजा हे अंमली पदार्थ विकण्यास सुरवात केली होती.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त श्री आशुतोष डुंबरे, मा.सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), डॉ.पंजाबराव उगले, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री शिवराज पाटील, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रतिबंध) गुन्हे श्री धनाजी शिरसागर यांचे

मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय शिंदे यांनी दिलेल्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश गावित, पोलीस उप निरीक्षक दिपेश किणी, सपोउपनिरी/राजेंद्र निकम, पोहवा/हरीष तावडे, पोहवा/अभिजीत मोरे, पोहवा/महेश साबळे, पोहवा/संदीप भांगरे, पोहवा/हेमंत महाले, पोहवा/शिवाजी वासरवाड, पोहवा/हुसेन तडवी, पोना/अनुप राक्षे, मपोहवा/शिल्पा कसबे, मपोशि/कोमल लादे यांनी केली आहे.